११६(९)

क्र.सैशा /५वीतुकडी/आदिवासी/धुळे/१५ क (७)
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे- १ दिनांक : २०/१०/२००८.

2 4 OCT 2008

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, धुळे.

**विषय :** आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अनुदानित तत्वावर मुकेशभाई आर. पटेल,धुळे या सैनिकी शाळेस मंजूर झालेली, परंतु त्यांना नको असलेली इ. ५वी ची जादा तुकडी श्री छत्रपती शिवाजी सैनिक विद्यालय, मोराणे, जि. धुळे या सैनिकी शाळेस मंजूर करणेबाबत..

संदर्भः १) शासन पत्र क्र. इसैशा/२००८/१०३/माशि ७, दिनांक २४.९.२००८
२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प धुळे यांचे पत्र क्र. धुजिप/ शिक्षण/ माध्य/१२/सैशा/वातुप्रस्ताव/६४/०८, दि.१७/४/२००८.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधीन पत्र क्र.२ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून कळविण्यात येते की, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक इसैशा/२००८/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४.१२.२००७ च्या सोबतच्या परिशिष्ट- अ मध्ये दर्शविल्यानुसार मुकेशभाई आर. पटेल, धुळे या सैनिकी शाळेस आदिवासी विद्यार्थ्यांकरिता जादा तुकडी मंजूर केली आहे. तथापि सदरची तुकडी सुरू करणे संस्थेस शक्य होणार नसल्याचे म्हणजेच त्यांना त्यांना सदर तुकडी नको असल्याचे संस्थेने लेखी कळविल्यामुळे त्यांना नको असलेली आदिवासी विद्यार्थ्यांची इ. ५वी ची जादा तुकडी श्री छत्रपती शिवाजी सैनिक विद्यालय, मोराणे, जि. धुळे या सैनिकी शाळेस अनुदानित तत्वावर सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पुर्तत [illegible]ाच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेने शासन निर्णय शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक इसैशा/१०९५/(२७८/९५)/माशि-८, दिनांक २६.९.१९९५ तसेच शासन निर्णय क्रमांक इसैशा/२००८/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४.१२.२००७ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

२) आदिवासी विद्यार्थ्यांच्या या जादा तुकडीस लागणा-या पायाभूत सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

३) या अतिरिक्त तुकडीसाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तसेंच विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार संस्थेने भरावयाचा आहे.

४) या आदिवासी विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रीया संबंधित यंत्रणेमार्फत करण्यात यावी.तदनंतर तसा अहवाल शासनाकडे सादर करावा.

५) शासन अनुदानासंदर्भात तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाबाबत प्रचलित नियम व आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेंच या विभागाकडून व आदिवासी विभागाकडून भविष्यात वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

६) मुकेशभाई आर. पटेल,धुळे या सैनिकी शाळेस आदिवासी विद्यार्थ्यांकरिता मंजूर झालेली तुकडी कायमस्वरूपी रध्द् करण्यात येऊन सदरहू तुकडीवर भविष्यात यापुढे सदर संस्थेचा कोणताही हक्क राहणार नाही या अटीवर इ. ५वी ची तुकडी श्री छत्रपती शिवाजी सैनिक विद्यालय, मोराणे, जि. धुळे या सैनिकी शाळेस सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी व तसे संबंधितांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

उपरोक्त अटी व शर्ती संस्थेस मान्य असल्यास त्यांच्याकडून तसे रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर शपथपत्र लिहून घेण्यात यावे व तदनंतर सदर शाळेला सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून इ.५ वीच्या आदिवासी विद्यार्थ्यांची एक अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी.

(एम.आर.कदम)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रतः शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक. यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी सादर

प्रतः प्राचार्य,श्री छत्रपती शिवाजी सैनिक विद्यालय, मोराणे, जि. धुळे.

प्रत; श्रीमती अ.अ.गावडे, अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत; सचिव, आदिवासी विकास विभाग,(कार्यासन-११) मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.